२८ बांधकामांवर कारवाई

बोरिवली-विरार विस्तार मार्गाचा मार्ग मोकळा

अभिषेक पाठक/मुंबई

बोरिवली आणि विरार दरम्यानच्या पाचव्या आणि सहाव्या रेल्वे मार्गिकेच्या विस्तारामध्ये येणारे अडथळे दूर करण्यासाठी पश्चिम रेल्वेने राम मंदिर रेल्वे स्थानकाच्या पूर्व बाजूकडील आपल्या जमिनीवरील २८ अनधिकृत बांधकामे हटवली आहेत. रेल्वे सुरक्षा दल (आरपीएफ), शहर पोलीस आणि रेल्वेच्या इतर विभागांच्या सहकार्याने ही धडक



कारवाई करण्यात आली.

या मोहिमेमध्ये ४३ आरपीएफ जवान, ५ शहर पोलीस कर्मचारी, संबंधित रेल्वे विभागाचे अधिकारी-कर्मचारी व कंत्राटदाराचे २२ कामगार जेसीबी मशीनसह सहभागी झाले होते.

विस्तार प्रकल्प वेळेत पूर्ण होणार

प्रवाशांच्या वाढत्या मागणीमुळे उपनगरीय रेल्वे नेटवर्कवर सतत ताण येत असल्याने रेल्वेची जमीन अतिक्रमणमुक्त करणे हे विस्तार प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे पाऊल ठरत आहे. रेल्वे पायाभूत सुविधांची कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी आणि अडथळे दूर करण्यासाठी राबवलेली मोहीम एका व्यापक मोहिमेचाच भाग आहे.

रेल्वे प्रकल्पांना गती मिळणार

गेल्या अनेक वर्षांपासून रेल्वे जमिनीवरील अनधिकृत बांधकामामुळे मुंबईतील नियोजित विस्तार आणि पायाभूत कामांमध्ये मोठे अडथळे निर्माण होत होते. ही जागा मोकळी झाल्यामुळे रेल्वे प्रशासनाला नवीन रुग्णालय/मार्ग, स्थानक पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण आणि रेल्वे टर्मिनन्सचा विकास यांसारख्या अतिरिक्त जमिनीची गरज असलेल्या प्रकल्पांना गती देणे शक्य होईल, अशी अपेक्षा आहे.

लोकल फेऱ्यांमध्ये होणार वाढ

बोरिवली-विरार पाचवी आणि सहावी मार्गिका प्रकल्प हा पश्चिम रेल्वे मार्गावरील उपनगरीय रेल्वे नेटवर्कची प्रवासी क्षमता वाढवण्यासाठी हाती घेण्यात आला आहे, जिथे दररोज लाखो प्रवासी प्रवास करतात. या अतिरिक्त मार्गिकांमुळे गाड्यांच्या संचलनात सुसूत्रता येईल आणि संबंधित पायाभूत सुविधा व ऑपरेशनल व्यवस्था पूर्ण झाल्यानंतर लोकल फेऱ्या वाढवण्यास अधिक वाव मिळेल.

'टास्क फोर्स स्थापन करा!'

उर्वी महाजनी/मुंबई

ठाणे खाडी पूल-३ (टीसीबी-३) च्या बांधकामामुळे पारंपरिक मच्छिमार समुदायाचे झालेले उपजीविकेचे नुकसान मोजण्यासाठी एक उच्चस्तरीय 'टास्क फोर्स' (कार्यदल) स्थापन करण्याचे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. बाधित मच्छिमारांना नुकसानभरपाईसाठी अनिश्चित काळ प्रतीक्षा करायला लावता येणार नाही, असे न्यायालयाने नमूद केले आहे.

वाशीगाव, जुहूगाव, कोपरखैर्णे, घणसोली आणि दिवा येथील पारंपरिक कोळी मच्छिमारांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या 'मारियाई मच्छिमार सहकारी संस्था मर्यादित' आणि इतर एका मच्छिमार संस्थेने दाखल केलेल्या याचिकांवर न्यायमूर्ती भारती डांगरे आणि न्यायमूर्ती मंजूषा देशपांडे यांच्या खंडपीठाने हा आदेश दिला. ठाणे खाडीतील बांधकाम, सागरी कामे तसेच हालचालींवरील निर्बंधांमुळे पारंपरिक मच्छिमारांचे मासेमारीचे क्षेत्र उद्ध्वस्त झाले आहे, मासेमारीचे प्रमाण घटले आहे आणि त्यांना सातत्याने आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे, असा दावा या संस्थांनी केला होता.

समिती स्थापन करा!

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या बाह्य पायाभूत सुविधांचा एक भाग असलेल्या स्टेल्थ/स्टिल्ट पुलांच्या बांधकामामुळे पारंपरिक मच्छिमार समुदायाला सोसाव्या लागलेल्या उपजीविकेच्या नुकसानाचे मूल्यांकन करण्यासाठी उच्च उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याचे निर्देश उच्च न्यायालयाने महाराष्ट्र सरकारला दिले. 'महाराष्ट्र स्मॉल स्केल ट्रॅडिशनल फिश वर्कर युनियन'ने दाखल याचिकेवर न्यायमूर्ती एम. सी. त्रिपाठी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठाने आदेश दिला.

पेटंट कार्यालयाने क्षयरोग औषधाचे पेटंट फेटाळले

स्वस्त उपचारांच्या प्रयत्नांना बळ

अमित श्रीवास्तव/मुंबई

मल्टि ड्रग-रेझिस्टंट ट्युबरकुलोसिस (एमडीआर-टीबी) म्हणजेच औषध-प्रतिबंधक क्षयरोगाच्या रुग्णांसाठी उपचार अधिक परवडणारे करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, भारतीय पेटंट कार्यालयाने 'ग्लोबल अलायन्स फॉर टीबी ड्रग डेव्हलपमेंट' (टीबी अलायन्स) चा पेटंट अर्ज फेटाळून लावला आहे. पेटंट कायद्यांतर्गत नवीनतेचा अभाव, संशोधनाचे वेगळेपण किंवा नावीन्य नसणे आणि इतर कायदेशीर निकषांच्या आधारे कार्यालयाने हे पेटंट नाकारले. या निर्णयामुळे 'बीपीएएल' उपचार पद्धतीमध्ये वापरल्या जाणाऱ्या औषधांच्या स्वस्त उपलब्धतेला अधिक बळ मिळाले आहे.

म्हणून अर्ज फेटाळला

'कॉम्बिनेशन ॲंटीबॅक्टेरियल कंपोजिशन ॲंड शॉर्ट कोर्स ॲंटीबॅक्टेरियल रेजिमेन' या शीर्षकाखाली हे पेटंट दाखल करण्यात आले होते. टीबी रुग्ण हक्क कार्यकर्ते एल्ड्रेल टेलिस आणि गणेश आचार्य तसेच 'दिल्ली नेटवर्क ऑफ पॉझिटिव्ह पीपल' (डीएनपी+) यांनी पेटंट कायद्याच्या कलम २५(१) अंतर्गत पूर्व-अनुदान आक्षेप नोंदवून या अर्जाला विरोध केला होता. त्यानंतर पेटंट कंट्रोलरने कायद्याच्या कलम १५ अंतर्गत हा अर्ज फेटाळून लावला.

वाल्मिकी जयंती, कोजागरी पौर्णिमा सोहळा



मुंबई : अखिल भारतीय साहित्य परिषद, दिल्ली पुरस्कृत साहित्य भारती (कोकण प्रांत) मुंबई उपनगर शाखेतर्फे महर्षी वाल्मिकी जयंती आणि कोजागरी पौर्णिमेनिमित्त 'जागर रामायणाचा, उत्सव चांदण्यांचा' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रमुख पाहुण्या कवयित्री कीर्ती पाटसकर आणि लेखिका शोभा नाखरे होत्या. सुजला अरगडे यांनी परिषद गीताने सुरुवात केली. संतोष खाडये यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, तर ॲड. केदार डिके यांनी निवेदन केले. पूर्वार्धात मनीषा जोशी, मनीषा साटम, रागिणी भणगे, स्मिता भोसले आणि भाग्यश्री फडके-धर्माधिकारी यांनी वाल्मिकी रामायण व योग वासिष्ठातील निवडक उताऱ्यांचे अभिवाचन केले. उत्तरार्धात मंदार श्रोत्री, प्रसाद कुळकर्णी, डॉ. आशा ब्राह्मणे, उदय जोशी, सूरज रेवाळे, ललित कुमार धोत्रे, मनीषा जोशी यांनी चंद्र-चांदणे या विषयावर कविता सादर केल्या. कीर्ती पाटसकर यांनी अभिवाचनाचा आढावा घेत रामायण हे केवळ महाकाव्य नसून जीवनदृष्टी असल्याचे सांगितले आणि आपली 'कोजागरी' ही शृंगारिक कविता सादर केली. आभार प्रदर्शन मुंबई संपर्कप्रमुख जयेश मेस्त्री यांनी केले.

राष्ट्रवादीच्या मुंबई अध्यक्षपदी झिशान सिद्दीकी

मुंबई : गेल्या दोन वर्षांपासून रिक्त असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या मुंबई विभागीय अध्यक्षपदी आमदार झिशान सिद्दीकी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार आणि राष्ट्रीय सरचिटणीस पार्थ पवार यांनी बुधवारी सिद्दीकी यांना नियुक्तीचे पत्र दिले.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची वेगळी चूल मांडल्यानंतर पक्षाच्या मुंबई अध्यक्षपदाची धुरा माजी खासदार समीर भुजबळ यांच्याकडे सोपवण्यात आली होती. मात्र, समीर भुजबळ यांनी २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत बंडखोरी केल्याने त्यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली. तेव्हापासून पक्षाचे मुंबई अध्यक्षपद रिक्त होते. आता सिद्दीकी यांच्या नेमणुकीने अजित पवार गटाला दोन वर्षानंतर मुंबईसाठी नेतृत्व लाभले आहे.

AXIS BANK

महत्वाची घोषणा

आम्ही स्थलांतरित होत आहोत

ॲक्सिस बँकेची आयसी कॉलनी, बोरीवली पश्चिम येथील

शाखा २ नोव्हेंबर २०२६ पासून

नवीन ठिकाणी स्थलांतरित होईल.

सध्याचा पत्ता:

बोरिवली पश्चिम शाखा, ॲक्सिस बँक., तळ आणि पहिला मजला, जलाराम बिझनेस सेंटर, चामुंडा सर्कल ऑफ, गांजावाला लेन, बोरिवली(प), मुंबई, महाराष्ट्र ४००९२

नवीन पत्ता:

ॲक्सिस बँक, आय. सी. कॉलनी बोरीवली शाखा, दुकान क्र. १ ते ५, तळ मजला, गोयल फेअरमाँट (पूर्वीचे 'लूर्ड्स सीएचएसएल'), होली क्रॉस रोड, आय. सी. कॉलनी, बोरीवली (पश्चिम), मुंबई, पिन: ४००१०३

आम्ही तुमचे स्वागत करण्यास उत्सुक आहोत.

vedanta iron & steel

वेदांता आयर्न अँड स्टील लिमिटेड

सीआयएन : एल२४१०९एमएच२०२३पीएलसी४११७७७
नोंदणीकृत कार्यालय : वेदांता आयर्न अँड स्टील लिमिटेड, सी-१०३, अतुल प्रोजेक्ट्स, कॉर्पोरेट अव्हेन्यू न्यू लिंक, चकाला एमआयडीसी, मुंबई, महाराष्ट्र - ४०० ०९३.
दूरध्वनी क्र. : +९१ ८३२ ६७१३६०१ ई-मेल : visl.cs@vedanta.co.in
वेबसाईट : www.vedantaironandsteel.com

पोस्टल बॅलेट आणि दूरस्थ ई-मतदानाची सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, कंपनी कायदा, २०१३ (**''कायदा''**) च्या कलम १०८ आणि कलम ११० मधील तरतुदी सहवाचता कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ (**''नियम''**) मधील नियम २० आणि २२, तसेच कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने जारी केलेले २२ सप्टेंबर, २०२५ दिनांकित सर्वसाधारण परिपत्रक क्र. ०३/२०२५ आणि या संदर्भात एमसीएने यापूर्वी जारी केलेली परिपत्रके (**''एमसीए परिपत्रके''**), सिक्युरिटीज ॲण्ड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ (**''सेबी लिस्टिंग रेग्युलेशन्स''**) मधील विनियम ४४ आणि इन्स्टीट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया (**''आयसीएसआय''**) जारी केलेली सर्वसाधारण सभांसंबंधीची सचिवीय मानके (**''एसएस-२''**) तसेच इतर लागू कायदे, नियम आणि विनियम (त्यामधील सध्या अंमलात असलेल्या कोणत्याही वैधानिक सुधारणा, बदल किंवा पुनःअधिनियमन आणि वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांसह) यांच्या अनुषंगाने, वेदांता आयर्न अँड स्टील लिमिटेड (**''कंपनी''**) खाली नमूद केलेले कामकाज पार पाडण्यासाठी दूरस्थ ई-मतदानाद्वारे पोस्टल बॅलेटच्या माध्यमातून कंपनीच्या समभागधारकांची (**''सदस्य''**) मंजुरी मागवत आहे :

अनु. क्र.	ठरावाचे वर्णन	ठरावाचा प्रकार
१.	कंपनी आणि कंपनीच्या काही निश्चित केलेल्या संबंधित पक्षांदरम्यान महत्त्वपूर्ण संबंधित पक्ष व्यवहार विचारात घेणे व मंजूर करणे	साधारण
२.	सेसा रिसोर्सेस लिमिटेड (''एसआरएल''), कंपनीची महत्त्वपूर्ण सहायक आणि कंपनीच्या काही निश्चित केलेल्या संबंधित पक्षांदरम्यान महत्त्वपूर्ण संबंधित पक्ष व्यवहार विचारात घेणे व मंजूर करणे.	साधारण
३.	सेसा मायनिंग कॉर्पोरेशन लिमिटेड (''एसएमसीएल''), कंपनीची महत्त्वपूर्ण सहायक आणि कंपनीच्या काही निश्चित केलेल्या संबंधित पक्षांदरम्यान महत्त्वपूर्ण संबंधित पक्ष व्यवहार विचारात घेणे व मंजूर करणे.	साधारण
४.	ब्लूम फाउंटन लिमिटेड (''बीएफएल''), कंपनीची महत्त्वपूर्ण सहायक आणि कंपनीच्या काही निश्चित केलेल्या संबंधित पक्षांदरम्यान महत्त्वपूर्ण संबंधित पक्ष व्यवहार विचारात घेणे व मंजूर करणे.	साधारण
५.	ईएसएल स्टील लिमिटेड (''ईएसएल''), कंपनीची महत्त्वपूर्ण सहायक आणि कंपनीच्या काही निश्चित केलेल्या संबंधित पक्षांदरम्यान महत्त्वपूर्ण संबंधित पक्ष व्यवहार विचारात घेणे व मंजूर करणे.	साधारण
६.	वेस्टर्न क्लस्टर लिमिटेड (''डब्ल्यूसीएल''), कंपनीची महत्त्वपूर्ण सहायक आणि कंपनीच्या काही निश्चित केलेल्या संबंधित पक्षांदरम्यान महत्त्वपूर्ण संबंधित पक्ष व्यवहार विचारात घेणे व मंजूर करणे.	साधारण
७.	देसाई सिमेंट कंपनी प्रायव्हेट लिमिटेड (''डीसीसीपीएल''), कंपनीची महत्त्वपूर्ण सहायक आणि कंपनीच्या काही निश्चित केलेल्या संबंधित पक्षांदरम्यान महत्त्वपूर्ण संबंधित पक्ष व्यवहार विचारात घेणे व मंजूर करणे.	साधारण

वरील एमसीए परिपत्रकांनुसार, कंपनीने स्पष्टीकरणात्मक निवेदनासह पोस्टल बॅलेट सूचना (**''सूचना''**) केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमातून अशा सदस्यांना पाठविली आहे, ज्यांची नावे डिपॉझिटरीजकडून प्राप्त झालेल्या कट-ऑफ तारखेनुसार म्हणजेच **शुक्रवार, २३ ऑक्टोबर, २०२६** (**''कट-ऑफ तारीख''**) रोजी डिपॉझिटरीजद्वारे ठेवण्यात आलेल्या सदस्य नोंदवहीमध्ये किंवा लाभार्थी मालकांच्या नोंदवहीमध्ये नमूद आहेत आणि ज्यांचे ई-मेल पत्ते कंपनी/केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड (**''केफिन''**)/डिपॉझिटरीज/डिपॉझिटरी पार्टिसिपंट (**''डीपीज''**) यांच्याकडे नोंदणीकृत आहेत आणि ही प्रक्रिया बुधवार, २८ ऑक्टोबर, २०२६ रोजी पूर्ण करण्यात आली आहे. त्यानुसार, सूचनेच्या प्रत्यक्ष प्रती, पोस्टल बॅलेट फॉर्म आणि पूर्वमुद्रांकित व्यावसायिक उत्तराचे लिफाफे सदस्यांना पाठविण्यात येत नाहीत आणि संमती किंवा असंमती कळविण्याची प्रक्रिया केवळ दूरस्थ ई-मतदान प्रणालीद्वारेच पार पाडली जाईल.

ज्या सदस्यांना त्यांचे ई-मेल पत्ते नोंदणीकृत नसल्यामुळे सूचना प्राप्त झालेली नाही, अशा सदस्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांचे ई-मेल पत्ते संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सकडे नोंदणीकृत करावेत किंवा अद्ययावत करावेत.

कट-ऑफ तारखेला कंपनीच्या भरणा झालेल्या समभाग भांडवलामधील सदस्यांच्या समभागांच्या प्रमाणात त्यांचे मतदानाचे अधिकार असतील.

कट-ऑफ तारखेला कंपनीचा समभागधारक नसलेल्या कोणत्याही व्यक्तीने पोस्टल बॅलेट सूचना केवळ माहितीसाठी असल्याचे समजावे.

कंपनीने सदस्यांना ई-मतदान सेवा उपलब्ध करून देण्यासाठी केफिनची नियुक्ती केली आहे. ई-मतदानाची सुविधा खालील कालावधीत उपलब्ध असेल :

ई-मतदानास प्रारंभ	गुरुवार, २९ ऑक्टोबर २०२६ रोजी स. ०९:०० वा. (भाप्रवे)
ई-मतदानाची समाप्ती	शुक्रवार, २७ नोव्हेंबर २०२६ रोजी सायं. ०५:०० वा. (भाप्रवे)

दूरस्थ ई-मतदानाची सुविधा शुक्रवार, २७ नोव्हेंबर, २०२६ रोजी सायं. ५:०० वाजल्यानंतर (भाप्रवे) तत्काळ बंद करण्यात येईल आणि त्यानंतर सदस्यांना त्यांची मते नोंदविण्याची परवानगी दिली जाणार नाही. कट-ऑफ तारखेला कंपनीच्या भरणा झालेल्या समभाग भांडवलामध्ये सदस्यांनी धारण केलेल्या समभागांच्या प्रमाणात सदस्यांचे मतदानाचे अधिकार असतील. एकदा ठरावावर मत नोंदविल्यानंतर सदस्याला त्यामध्ये नंतर बदल करता येणार नाही. कृपया नोंद घ्यावी की, सदस्यांची संमती किंवा असंमती कळविण्याची प्रक्रिया केवळ दूरस्थ ई-मतदान प्रणालीद्वारेच पार पाडली जाईल. कट-ऑफ तारखेला डिपॉझिटरीजद्वारे ठेवण्यात आलेल्या सदस्य नोंदवहीमध्ये / लाभार्थी मालकांच्या यादीमध्ये ज्यांची नावे नोंदविलेली आहेत, असे सदस्यच दूरस्थ ई-मतदानाद्वारे मतदान करण्यास पात्र असतील.

सदस्यांना ही सूचना इलेक्ट्रॉनिक माध्यमातून प्राप्त होण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कंपनीने एमसीए परिपत्रकांनुसार ई-मेल पत्त्यांच्या नोंदणीसाठी आपल्या (आरटीए) शी सोबत व्यवस्था केली आहे. ज्या सदस्यांनी त्यांचे ई-मेल आयडी नोंदणीकृत केलेले नाहीत, त्यांनी समभाग इलेक्ट्रॉनिक स्वरूपात धारण केलेले असल्यास संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपंटमार्फत त्यांची नोंदणी करावी आणि समभाग प्रत्यक्ष स्वरूपात धारण केलेले असल्यास नोंदणीकृत ई-मेल आयडीवरून कंपनीला visl.cs@vedanta.co.in या पत्त्यावर किंवा कंपनीचे रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट, केफिन यांना einward.ris@kfintech.com या पत्त्यावर ई-मेल पाठवून किंवा केफिनच्या पत्त्यावर प्रत्यक्ष कागदपत्रे पाठवून त्यांची नोंदणी करावी, अशी विनंती करण्यात येत आहे.

आरटीएकडे ई-मेल पत्त्याची नोंदणी करण्याची प्रक्रिया आणि दूरस्थ ई-मतदानाची प्रक्रिया सूचनेमध्ये देण्यात आली आहे.

कंपनीच्या संचालक मंडळाने पोस्टल बॅलेट प्रक्रिया निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी सीएस शिवराम भट (सदस्यत्व क्र.: ए१०४५४, सीपी क्र.: ७८५३) यांची छाननीकर्ता म्हणून नियुक्ती केली असून त्यांनी या नियुक्तीसाठी आपली संमती कळविली आहे.

सदस्यांनी नोंद घ्यावी की, ही सूचना कंपनीच्या www.vedantaironandsteel.com या वेबसाईटवर, स्टॉक एक्स्चेंजेसच्या वेबसाईटवर म्हणजेच बीएसई लिमिटेड (**''बीएसई''**) आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड (**''एनएसई''**) यांच्या अनुक्रमे www.bseindia.com आणि www.nseindia.com या वेबसाईटवर तसेच केफिनच्या www.evoting.kfintech.com या वेबसाईटवरही उपलब्ध असेल.

छाननीकर्ता आपला अहवाल कंपनीचे अध्यक्ष किंवा कंपनीच्या कोणत्याही प्राधिकृत व्यक्तीकडे सादर करतील आणि पोस्टल बॅलेटचे निकाल वैधानिक कालमर्यादेत जाहीर करण्यात येतील. सदर निकाल छाननीकर्त्यांच्या अहवालासह कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात आणि कॉर्पोरेट कार्यालयात प्रदर्शित करण्यात येतील तसेच कंपनीचे समभाग सूचीबद्ध असलेल्या एनएसई आणि बीएसई यांना कळविण्यात येतील. याव्यतिरिक्त, निकाल कंपनीच्या www.vedantaironandsteel.com या वेबसाईटवर आणि केफिनच्या evoting.kfintech.com या वेबसाईटवरही अपलोड करण्यात येतील.

कोणत्याही शंका असल्यास, आपण evoting.kfintech.com या वेबसाईटच्या डाउनलोड विभागात उपलब्ध असलेल्या समभागधारकांसाठीच्या वारंवार विचारले जाणारे प्रश्न (**''एफएक्यूज''**) आणि ई-मतदान वापरकर्ता मार्गदर्शिकेचा संदर्भ घेऊ शकता. कोणत्याही शंका / समस्या / तक्रारी असल्यास, आपण श्री. गणेश चंद्र पात्रो, डेप्युटी व्हाईस प्रेसिडेंट, केफिन, सेलेनियम, टॉवर बी, प्लॉट क्र. ३१ आणि ३२, गच्चीबोवली, नानकरामगुडा, सेरिलिंगमपल्ली मंडल, हैदराबाद - ५०० ०३२, भारत यांच्याशी ई-मेल : einward.ris@kfintech.com किंवा १-८००-३०९-४००१ (टोल फ्री) या क्रमांकावर संपर्क साधू शकता.

नोंदणीकृत कार्यालय: **सी-१०३, अतुल प्रोजेक्ट्स, कॉर्पोरेट अव्हेन्यू न्यू लिंक,** **चकाला एमआयडीसी, मुंबई, महाराष्ट्र, ४०० ०९३** **सीआयएन: एल२४१०९एमएच२०२३पीएलसी४११७७७** **ई-मेल आयडी: visl.cs@vedanta.co.in** **वेबसाईट: www.vedantaironandsteel.com** **दूरध्वनी: +९१ ८३२६७१३६०१** **ठिकाण: पणजी-गोवा** **दिनांक: २९ ऑक्टोबर, २०२६**	**संचालक मंडळाच्या आदेशानुसार** **वेदांता आयर्न अँड स्टील लिमिटेडकरिता** **सही/-** **टीना लखानी** **कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी** **एसीएस क्र.: ३४७२३**

पाया मजबूत करीत, राष्ट्रांची उभारणी करीत